**प्रेसनोट** दि. 11/12/2025

**ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणेकडून परिमंडळ अधिकारी, अन्नधान्य वितरण कार्यालय, फ झोन भोसरी, पुणे यांचे विरोधात लाचमागणी व स्विकारलेप्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे घटक** |
|---|---|
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | भोसरी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलमान्वये. |
| **तक्रारदार** | पुरुष वय 25 वर्षे, व्यवसाय -समाजकार्य |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | गजानन अशोकराव देशमुख ,वय 36 वर्ष, व्यवसाय नोकरी पद -परिमंडळ अधिकारी, अन्नधान्य वितरण कार्यालय 'फ' झोन,भोसरी,पुणे, रा.ठी. फ्लॅट नंबर 404 निर्माण हिलसाईड, तळजाई पठार, धनकवडी, पुणे. **(वर्ग :- 2)** |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | 12,600/- (बारा हजार सहाशे रूपये फक्त) |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी** | सुरवातीची लाच मागणी 19,000/- तडजोडीअंती रू. 16,000/- (सोळा हजार रूपये फक्त) लाच मागणी केली. |
| **पडताळणी दिनांक** | दि. 11/12/2025 |
| **स्वीकारलेली लाच रक्कम** | 16,000/- (सोळा हजार रूपये) |
| **सापळा दिनांक** | दि. 11/12/2025 |
| **ठिकाण** | अन्नधान्य वितरण कार्यालय भोसरी पुणे येथे आ.लो.से. यांचे कार्यालयात |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. प्रविण निंबाळकर, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9552574140) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती आसावरी शेडगे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 8425808058) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार हे अपंग असून समाजकार्य करतात त्यांना शासकीय कागदपत्रांची माहिती असल्याने ते त्यांचे मित्र व ओळखीचे लोकांसाठी नवीन रेशन कार्ड काढून देण्यासाठी मदत करत असतात. तक्रारदाराचे मित्र व ओळखीचे असे एकूण 14 जणांनी तक्रारदार यांना त्यांची नवीन रेशन कार्ड काढण्यासाठीचे अधिकार पत्र देऊन सोबत सरकारी फी प्रत्येकी 50/- रुपये असे दिल्यानंतर तक्रारदाराने 14 जणांचे प्रस्ताव तयार करून सोबत आवश्यक ती कागदपत्र जोडून पन्नास रुपये शासकीय फी ऑनलाइन भरल्यानंतर त्या 14 जणांना 14 रेशन कार्ड चे 'एन' नंबर प्राप्त झाले. त्यानंतर तक्रारदार हे सदर 14 नवीन रेशन कार्ड मिळणेकरिता भोसरी अन्न नागरी पुरवठा विभागाचे चे पुरवठा निरीक्षक देशमुख यांना भेटले असता त्यांनी प्रत्येक नवीन रेशन कार्ड साठी 900/- रुपये प्रमाणे 14 रेशन कार्डचे 12,600/- रुपये द्यावे लागतील असे तक्रारदार यांना सांगितले. देशमुख यांनी प्रत्येक रेशन कार्ड साठी 900/- रुपये प्रमाणे मागितलेले बारा हजार सहाशे रुपये हे शासकीय फ़ी व्यतीरिक्त असून त्यांनी मागितली रक्कम ही लाच रक्कम असून ती देण्याची तक्रारदार यांची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक 10/12/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांच्याकडे तक्रार दिली होती.

यातील तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने दि. 11/12/2025, रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक परीमंडळ अधिकारी भोसरी, गजानन देशमुख यांनी तक्रारदार यांच्याकडे 14 रेशन कार्ड मंजूर करून त्यावर सही शिक्का देण्यासाठी सुरुवातीस 14 रेशन कार्ड पैकी 10 रेशन कार्ड करता प्रत्येकी 1,500/- असे एकूण 15,000/- रुपये व उर्वरित चार रेशनकार्ड साठी प्रत्येकी 1,000/- रुपये प्रमाणे एकूण 4,000/- असे 14 रेशन कार्ड नवीन तयार करून सही शिक्क्याने देण्यासाठी 19 हजार रुपयाची मागणी करून ताडजोडीअंती 16,000/- रुपयाची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

दि.11/12/2025 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान यातील आरोपी लोकसेवक गजानन अशोकराव देशमुख, परिमंडळ अधिकारी, अन्नधान्य वितरण कार्यालय, भोसरी, पुणे यांनी त्यांचे कार्यालय अन्नधान्य वितरण कार्यालय भोसरी पुणे येथे तक्रारदाराकडून 16,000/- रुपयाची लाच स्वीकारली असता 14:19 वाजता रंगेहात पकडण्यात आले आहे.

वरील आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध भोसरी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.

1) **अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) **व्हॉट्स-अॅप क्रमांक** - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
5) ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

सहायक पो. आयुक्त/पोलीस उप अधिक्षक
सत्यमेव जयते
अॅन्टी करप्शन ब्युरो

11/12/25

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.